सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १८ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# विधान परिषदेचा बिगुल वाजला! स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर; १८ जूनला होणार मतदान

## अमरावती मध्ये भाजप /कॉंग्रेस मध्ये होणार तगडा मुकाबला


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८मुंबई** पावसाळी अधिवेशनाआधी विधान परिषदेच्या सदस्यसंख्येत आणखी भर पडणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ जागांसाठीची निवडणूक जाहीर झाली आहे. या जागांसाठी १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. विशेष म्हणजे, एकूण १७ जागांपैकी १६ जागांवर नियमित निवडणूक, तर एका ठिकाणी पोटनिवडणूक होत असून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आमदार राहिलेल्या नागपूर विधान परिषद मतदारसंघासाठी ही पोटनिवडणूक पार पडणार आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यामुळे या मतदारसंघांतील आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या, परिणामी गेल्या दोन-अडीच वर्षांपासून या जागा रिक्त आहेत. दरम्यान, विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्यांपैकी २२ सदस्य हे स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून दिले जातात आणि नियमानुसार, संबंधित मतदारसंघातील एकूण मतदारसंख्येपैकी किमान ७५ टक्के मतदारसंख्या उपलब्ध असल्यास ही निवडणूक घेता येते.

### सदस्य कसे निवडले जातात?

महाराष्ट्राच्या विधान परिषदेची एकूण सदस्यसंख्या ७८ असून, या सभागृहातील सदस्यांची निवड वेगवेगळ्या घटकांमधून केली जाते. या रचनेनुसार, एकूण ७८ सदस्यांपैकी ३० सदस्य आमदारांकडून निवडले जातात, २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून, ७ सदस्य पदवीधर मतदारसंघातून आणि ७ सदस्य शिक्षक मतदारसंघातून निवडून येतात, तर उर्वरित १२ सदस्यांची थेट नियुक्ती राज्यपाल करतात.



विधानपरिषदेच्या निवडणुकीचे संपूर्ण वेळापत्रक

जाहीर झालेल्या या निवडणुकीच्या वेळापत्रकानुसार, २५ मे रोजी निवडणुकीची अधिकृत अधिसूचना जारी केली जाईल, तर उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी १ जून ही शेवटची तारीख असेल. त्यानंतर २ जून रोजी उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल आणि उमेदवारांना अर्ज माघारी घेण्यासाठी ४ जूनपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या संपूर्ण प्रक्रियेनंतर १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान पार पडणार असून, अखेर २२ जून रोजी मतमोजणी केली जाईल.

### कुठे कुठे होणार निवडणुका?

आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजी नगर-जालना आणि नागपूर या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमध्ये ही निवडणूक पार पडू शकते.

## कांदा प्रश्नावर ठाकरेंची शिवसेना आक्रमक:पहिल्यांदाच समृद्धी महामार्गावर चक्काजाम आंदोलन; हजारो शिवसैनिक रस्त्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ छत्रपती संभाजीनगर**

राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत असताना त्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर मोठे चक्काजाम आंदोलन करत शिवसैनिकांनी सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. शिवसेना नेते आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. समृद्धी महामार्गावरील इंटरचेंज क्रमांक १९, जांबरगाव येथे हजारो शिवसैनिकांनी एकत्र येत सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

विशेष म्हणजे, समृद्धी महामार्ग रोखून आंदोलन करण्याची ही पहिलीच वेळ असल्याची चर्चा आंदोलनस्थळी होती. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नसल्याने त्यांची अवस्था बिकट झाली आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात कांद्याला अत्यंत कमी भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल



झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने थेट रस्त्यावर उतरून सरकारला इशारा दिला. आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काही काळ वाहतुकीवर परिणाम झाल्याने महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. आंदोलनावेळी अंबादास दानवे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला. कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकरी जगला तरच राज्याची अर्थव्यवस्था मजबूत राहील. मात्र आज कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असून सरकार फक्त आश्वासनांपुरते मर्यादित राहिले आहे, असे दानवे म्हणाले. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी लढा आणखी तीव्र केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.


## लातूरच्या RCC क्लासेसचे शिवराज मोटेगावकरांना उड्रख कडून अटक

### NEET पेपरफुटी प्रकरण: मोटेगावकरला ९ दिवसांची CBI कोठडी, १० दिवस आधीच मिळवला होता पेपर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८लातूर** - छएएढ पेपरफुटीचे धागेदोरे आता जुळू लागले आहेत. या प्रकरणात आधी रसायनशास्त्राचे प्राध्यापक पी.व्ही. कुलकर्णी आणि नंतर वनस्पतिशास्त्र लेक्चरर मनीषा मांढरे यांना अटक करण्यात आली. आता छएएढ परीक्षा घेणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सी (छढ-) च्या अधिकाऱ्याचाही सहभाग होतासीबीआय कोर्टाने शिवराज मोटेगावकरला ९ दिवसांची कोठडी सुनावली आहे. शिवराज मोटेगावकर हे आरसीसी क्लासेसचे संचालक असून आता त्यांची सीबीआयमार्फत चौकशी केली जाणार आहे.

याबाबत अधिकची माहिती अशी की, नीट पेपरफुटी प्रकरण केवळ राजयपूर्तेच मर्यादेत न राहता देशभरातील मोठे रॅकेट असल्याचे समोर आले आहे. यात अनेकांना ताब्यात घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे यात प्राध्यापकांचा देखील समावेश आहे. यापूर्वी दोन प्राध्यापकांना सीबीआयने अटक केली होती. आता शिवराज मोटेगावकर यांना



देखील अटक करण्यात आली आहे. कारण मोटेगावकर यांचे राज्यभरात नीट परीक्षेसंदर्भात मोठे क्लासेस आहेत. गेल्याच आठवड्यात मोटेगावकर यांचे ज्या ज्या ठिकाणी क्लासेस आहेत त्या ठिकाणी छापेमारी केली होती. यावेळी काही महत्त्वाची कागदपत्रे आणि काही इलेक्ट्रोनिक गॅझेट देखील सीबीआयने ताब्यात घेतली होती.त्यानंतर आज शिवराज मोटेगावकर यांना आज सीबीआयने अटक केली असून त्यांना सीबीआयच्या विशेष न्यायालयात हजर केले जाईल. त्यानंतर या संपूर्ण रॅकेटमध्ये मोटेगावकरांचा काय संबंध आहे हे समोर येणार आहे. तसेच जे प्रमुख आरोपी आहेत, लातूरचे पी.व्ही कुलकर्णी, पुण्यातल्या मनीषा मांढरे यांना देखील अटक करण्यात आलेली आहे. त्यामुळे आता या सर्वांचा एकमेकांशी काही संबंध आहे का? याचा तपास सीबीआयकडून करण्यात येत आहे.

मोटेगावकरकडे परीक्षेच्या १० दिवस आधीच नीटची प्रश्नपत्रिका

चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार, देशभरात ३ मे रोजी नीटची परीक्षा होती. परीक्षेच्या १० दिवस आधीच म्हणजे २३ एप्रिल रोजीच शिवराज मोटेगावकरने नीटची प्रश्नपत्रिका मिळवली होती. चौकशीत मोटेगावकरच्या मोबाइलमध्येच नीटची प्रश्नपत्रिका आणि उत्तपत्रिका मिळाल्याचे समोर आले आहे. शिवराज मोटेगावकरने विवेक पाटील नावाच्या एका व्यक्तीला तसेच विद्यार्थ्यांना नीटची प्रश्नपत्रिका पाठवली होती, मात्र तपास यंत्रणेसमोर तो सध्या लाभार्थी विद्यार्थ्यांची नावे सांगण्यास टाळाटाळ करत आहे. इतकेच नव्हे तर, स्वतःचा बचाव करण्यासाठी त्याने परीक्षा संपल्यानंतर या प्रश्नपत्रिकेचे सर्व तांत्रिक पुरावे देखील नष्ट केले असल्याचे तपासात समोर आले आहे.

## लालपरीचा प्रवास महाग होणार का?

### एसटी तिकीट दराबाबत मंत्री प्रताप सरनाईकांनी दिली महत्वाची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८मुंबई** - मागील काही महिन्यांपासून इराण आणि अमेरिकेमध्ये युद्ध सुरू आहे. या युद्धाचा परिणाम जगभरात इंधनावर झाला आहे. देशात दूध, सोनं-चांदी यामधील दरात वाढ झाली आहे. पेट्रोल- डिझेलच्या दरातही वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आता एसटीच्या तिकीट दरातही वाढ होणार असल्याचे संकेत दिले आहेत. यावर मंत्री प्रताप सरनाईक यांनी माहिती दिली आहे.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एसटीला १० लाख ८७ हजार लिटर डिझेल लागते. एसटीला इंडियन ऑईलकडून डिझेल पुरवठा होत आहे. मागील आठवड्यात ३ रुपये दर वाढवला आहे.

दरवाढीमुळे ३३ लाख ७० हजार आम्हाला जास्त मोजावे लागत आहेत. यामुळे महामंडळाचा वर्षाला १२४ कोटींचा तोटा होतो आहे. जागतिक पातळीवर युद्धाचा भडका उडाल्यास आणखी परिणाम होईल, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही याबाबत आवाहन केले आहे. ऋभविष्यात काय होईल हे आता सांगता येत नाही. विशेष सवलत देण्याचा निर्णय झाल्यास आम्ही दरवाढ करणार नाही. उद्या




कॅबिनेट बैठक आहे, मुख्यमंत्री असतील तेव्हा त्यांना पत्र देणार आहेत. मे पर्यंत आम्ही थांबणार आहोत. पुढील १० ते १२ दिवस केंद्र आणि राज्य सरकारनं पुर्तता केली तर दरवाढ करणार नाही, मात्र पुर्तता न झाल्यास दरवाढ करावी लागेल, ऑईल कंपनीने पूर्व किंमतीत दिले तर दरवाढ करणार नाही. इंधनवाढ झाली तर आम्हाला दरवाढ करावी लागेल, असे संकेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

बाईट टॅक्सीबाबत मी सायबर पोलिसांना पत्र देऊन अनधिकृत रित्या चालू आहेत. काही अनधिकृत रित्या पेट्रोल बाईक सुरू होत्या.

काही ठिकाणी महिलांबरोबर गैरप्रकार घडले होते. अनेक नियम पायदळी तुडवल्या जात होत्या. यामुळे ही कारवाई केली असेही सरनाईक म्हणाले.

## PDMC मध्ये परिचारिकांचे अचानक कामबंद आंदोलन

### वेतन व पुनर्नियुक्तीच्या मुद्द्यावरून रुग्णसेवेवर परिणामाची शक्यता

**विदर्भा प्रजासत्ताकदि.१८ अमरावती**

बॉटम ३७अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल मध्ये परिचारिकांनी अचानक आंदोलनाचा पवित्रा घेतल्याने रुग्णालय प्रशासनात खळबळ उडाली आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता सुरू करण्यात आलेल्या या कामबंद आंदोलनामुळे रुग्णसेवा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली असून रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.माहितीनुसार, सोमवारी दुपारच्या सुमारास परिचारिका झऊ्वउ च्या आवारात एकत्र जमल्या आणि त्यांनी आंदोलन सुरू केले. प्रशासनाला याबाबत कोणतीही पूर्वकल्पना देण्यात आली नसल्याने सुरुवातीला आंदोलनाचे नेमके कारण स्पष्ट झाले नव्हते. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे रुग्णालयातील नियमित कामकाजावर परिणाम



होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी परिचारिकांनी वेतन थकबाकी आणि पुनर्नियुक्तीच्या मागण्यांसंदर्भात अमरावती येथील कामगार आयुक्त कार्यालयात निवेदन दिले होते. त्यानंतर कामगार आयुक्त कार्यालयाने झऊ्वउ प्रशासनाकडे सविस्तर अहवाल मागविला होता. मात्र त्या अहवालाची प्रतीक्षा न करता परिचारिकांनी थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याचे समोर आले आहे.दरम्यान, आंदोलनस्थळी उपस्थित परिचारिकांकडे आंदोलनाच्या कारणांबाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनी माध्यमांसमोर बोलण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांच्या नेमक्या मागण्या आणि पुढील भूमिका अद्याप स्पष्ट झालेल्या नाहीत.या प्रकारामुळे रुग्णालय प्रशासन सतर्क झाले असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी हालचाली सुरू करण्यात आल्याची माहिती आहे. प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## ठाकरेंचे खासदार टप्प्याटप्प्याने शिंदेंच्या संपर्कात, हिंगोलीच्या खासदाराने घेतली एकनाथ शिंदेंची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**- राज्यात एकीकडे ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू असतानाच आता ठाकरेंच्या एका खासदाराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी शिंदेंची भेट घेतली. या भेटीमागचं नेमकं कारण अद्याप समोर आलं नाही. मात्र, ठाकरेंच्या शिवसेनेला यामुळे धक्का बसणार अशी चर्चा पुन्हा रंगली आहे.

एकीकडे एकनाथ शिंदे यांचे नेते ऑपरेशन टायगरवर अनेक दावे करताना दिसत आहेत. ठाकरेंचे जवळपास सात खासदार शिंदेंच्या



शिवसेनेत जाणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. अशात हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी नंदनवन या शिंदेंच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे.

मतदारसंघातील विकासकामे आणि निधीसाठी ही भेट घेतल्याचा दावा आष्टीकरांच्या कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. मात्र ठाकरेंचे काही खासदार हे टप्प्याटप्प्याने एकनाथ शिंदेंच्या संपर्कात येत असल्याचं दिसतंय. काही दिवसांपूर्वी खासदार संजय दिना पाटील यांची एकनाथ शिंदे यांनी भेट घेतली होती. त्याचसोबत परभणीचे खासदार संजय जाधव हेदेखील ठाकरेंची साथ सोडून शिंदेंच्या शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा सुरू आहे. अशात आता नागेश पाटील आष्टीकर यांनी देखील एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर त्याची जोरदार चर्चा रंगली आहे.

# संपादकीय ......

## धावत्या भेटीतला मास्टरस्ट्रोक

*होर्मुझच्या सामुद्रधुनीवरून जगभरात अस्वस्थता आहे. काल-परवापर्यंत आखातात अस्थिरता निर्माण झाल्यास इंधनाचे दर भडकतात इथपर्यंतचा विचार केला जात होता. पण होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून तेलपुरवठा खंडितही होऊ शकतो, हे यंदाच्या इराण-अमेरिका संघर्षाने जगाला दाखवून दिले. यातून धडा घेत केंद्र सरकारने ऊर्जासुरक्षेकडे सर्वाधिक लक्ष देण्यास प्रारंभ केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सध्या सुरू असलेला पाच देशांचा दौरा यादृष्टीने मोलाचा ठरला आहे. विशेषतः या दौर्याची सुरुवात ज्या संयुक्त अरब आमिरातीपासून झाली, तेथील अवघ्या दोन-अडीच तासांच्या भेटींमध्ये राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्यासोबत एकूण सात महत्त्वाचे करार करण्यात आले.*

*यातील इंडियन स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्हज लिमिटेड आणि अबुधाबी नॅशनल ऑईल कंपनी म्हणजेच ॲडनॉक यांच्यात धोरणात्मक सहकार्यासाठी झालेला करार भारताच्या इंधनचिंता बर्याच प्रमाणात दूर करणारा आहे. या करारानुसार यूएई भारताच्या धोरणात्मक तेल साठ्यांमध्ये ३ कोटी बॅरल्स खनिज तेलाची साठवणूक करणार आहे. यामध्ये विशाखापट्टणम येथील केंद्रासह ओडिशातील चंडीखोल येथील प्रस्तावित साठवणूक केंद्राचा विकास केला जाईल. तसेच यूएईमधील फुजैराह येथेही भारतासाठी खनिज तेल साठवण्यावर संमती झाली. यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावाच्या काळात भारताला थेट इंधन पुरवठा उपलब्ध होऊ शकेल. सध्या भारताकडे विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पादुर येथे एकत्रितपणे ५.३ दशलक्ष टन तेल साठा करण्याची क्षमता आहे.*

*आता एकूण साठ्यात ४० लाख टनांहून अधिक कच्च्या तेलाची भर पडणार आहे. भारतात प्रतिदिन तेलाची मागणी सुमारे ६० लाख बॅरल इतकी आहे. देशातील तेल कंपन्यांकडे सामान्यतः ६४ दिवसांचा साठा उपलब्ध असतो. यूएईने देऊ केलेल्या अतिरिक्त तेलामुळे एकूण साठवणूक क्षमतेत आणखी १२ ते १३ दिवसांची भर पडणार आहे. यामुळे संकटकाळात भारत अधिक काळ सुरक्षित राहू शकेल. काही दिवसांपूर्वी यूएईने ओपेक आणि ओपेक प्लस या प्रमुख तेल उत्पादक राष्ट्रांच्या संघटनांमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. तेल उत्पादनावर निर्बंध यूएईला नको आहेत. त्यांना जास्तीत जास्त तेल उत्पादन करून त्यातून येणारा पैसा नव्या क्षेत्रांमध्ये गुंतवायचा आहे. ही बाब भारताच्या पथ्यावर पडणारी आहे. याखेरीज एलपीजीच्या दीर्घकालीन पुरवठ्याबाबत झालेल्या करारामुळे स्वयंपाकाच्या गॅस पुरवठ्याबाबत भक्कम आधार मिळणार आहे.*

*सध्या भारताच्या एकूण एलपीजी आयातीपैकी ४० टक्के पुरवठा यूएईमधून होतो. नव्या करारामुळे जागतिक बाजारपेठेतील किमतींच्या धक्क्यांपासून भारतीय ग्राहकांचे रक्षण शक्य होणार आहे. याव्यतिरिक्त यूएईने भारतात ५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा केली. संरक्षण, सागरी सहकार्य, जहाजबांधणी आणि प्रगत संगणन यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्येही दोन्ही देशांनी अनेक महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षर्या केल्या. आर्थिक गुंतवणुकीच्या दृष्टीनेही यूएई भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. अमिरातीतील सार्वभौम निधी आणि मोठ्या गुंतवणूक संस्था भारतातील पायाभूत सुविधा, बंदरे, महामार्ग, ऊर्जा, विमानतळ, लॉजिस्टिक्स आणि डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत. अमिरातीने दीर्घकालीन विकास प्रकल्पांमध्ये दाखवलेला विश्वास आणि गुंतवणुकीमुळे भारतातील रोजगारनिर्मिती, औद्योगिक वाढ आणि पायाभूत विकासाला चालना मिळणार आहे. आतापर्यंत भारत आणि यूएई यांच्यातील संरक्षण सहकार्य हे केवळ लष्करी सराव आणि प्रशिक्षणापुरतेच मर्यादित होते. मात्र, बदलत्या भौगोलिक-राजकीय परिस्थितीचा विचार करता दोन्ही देशांनी 'स्ट्रॅटेजिक डिफेन्स पार्टनरशिप'अंतर्गत तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि दहशतवादविरोधी लढाईत एकत्र काम करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेसोबतच्या वादात इराणने दुबई शहराला लक्ष्य केल्यामुळे यूएईचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते; त्यामुळे हा संरक्षण करार यूएईसाठी अत्यंत मोलाचा ठरणार आहे.*

*एकेकाळी केवळ तेल पुरवठादार राष्ट्र म्हणून पाहिला जाणारा यूएई आज भारतासाठी व्यापार, ऊर्जा, गुंतवणूक, तंत्रज्ञान, संरक्षण, सागरी सुरक्षा आणि पश्चिम आशियातील सामरिक संतुलन या सर्वच क्षेत्रांत अत्यंत महत्त्वाचा भागीदार बनला आहे. पश्चिम आशियातील व्यापारासाठी दुबई हे भारतासाठी एक महत्त्वाचे प्रवेशद्वार मानले जाते. भारतीय वस्त्रोद्योग, रत्नजडित दागिने, अन्नप्रक्रिया, औषधनिर्मिती, अभियांत्रिकी उत्पादने आणि माहिती तंत्रज्ञान सेवा यांना अमिरातीच्या बाजारपेठेत मोठी मागणी आहे. त्याचप्रमाणे भारतालाही तेथून कच्चे तेल, पेट्रोकेमिकल्स, सोने आणि विविध औद्योगिक उत्पादने आयात केली जातात. यूएईमध्ये आजघडीला सुमारे ४० लाख भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. तेथील अर्थव्यवस्थेच्या उभारणीत भारतीयांचे मोठे योगदान आहे. यूएई आणि भारताच्या वाढत्या मैत्री संबंधांना आखातातील सत्ता समीकरणांचा एक पदर आहे. सौदी अरेबिया आणि यूएई हे दोन्ही देश एकमेकांचे स्पर्धक आहेत.*

# अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे माजी पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## 'गुळतुला' व गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती :**

जिल्ह्याच्या लोकप्रिय नेत्या तथा माजी पालकमंत्री श्रीमती यशोमतीताई ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आज, रविवार दिनांक १७ मे २०२६ रोजी अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने विविध सामाजिक व रचनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक गौरक्षण येथे सर्व काँग्रेस नेत्यांच्या, पदाधिकाऱ्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या अभूतपूर्व उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.या मुख्य कार्यक्रमात माजी पालकमंत्री श्रीमती यशोमतीताई ठाकूर यांची 'गुळतुला' करण्यात आली. वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत कार्यक्रमात गरजू व वंचित महिलांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने 'शिलाई मशीन'चे वाटप करण्यात आले. महिलांना रोजगार व आधार देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. या प्रसंगी उपस्थित नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी यशोमतीताईंना दीर्घायुष्य लाभो, अशा शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे नियोजन अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. बबलू शेखावत आणि मनपाचे विरोधी पक्षनेते तथा माजी महापौर श्री. विलास इंगोले यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते.या सोहळ्याला प्रामुख्याने माजी खासदार अनंतरावजी गुढे,शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले,स्वीकृत नगरसेवक मिलिंद चिमोटे,अनिल अग्रवाल,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे,संजय वाघ,विनोद मोदी, आनंद बाबू भामोरे, हरिभाऊ मोहोड,नगरसेवक प्रशांत महल्ले,नगरसेविका अनिता काळे, नगरसेविका लुबना तनवीर, नगरसेवक धीरज हिवसे,



नगरसेविका राजश्री राजेंद्र जठाळे, नगरसेविका मालता गवई, नगरसेविका अर्चना आत्राम, नगरसेविका आस्मा फिरोज खान, नगरसेवक विक्की वानखडे, नगरसेवीका सुनीता मनोज भेले,नगरसेविका ललिता सुरेश रतावा, नगरसेवक संजय शिरभाते, नगरसेविका अफसर जहा सादिक शहा,नगरसेवक मोहम्मद रेहान मोहम्मद यासीन (बल्ला भाई), निलेश गुहे, नितीन काळे, अनिकेत ढेंगळे, वैभव देशमुख, आशिष यादव, संकेत साहू, अभिनंदन पेंढारी, पुरोषातम मुंदडा, दीपक हुंडीकर, किरण साऊरकर, अब्दुल रफीक पत्रकार, मैथिली पाटील, वंदना निरगुडे, शुभांगी वरघट, अविनाश पांडे, किरण चांदवडकर, कांचन खोडके, अक्षय नगराळे, विजय राठोड, रवी चावरे, प्रवीण नवरंगे, प्रदीप अरबट, बिलाल भाई, नौशाद भाई, जावेद साबीर, जुबेर भाई, प्रीतम ठाकूर, प्रभाकर वाळसे, गजानन राजगुरे, मुकेश छांगाणी, प्रा.अनिल देशमुख, सतीश गवई,सतीश इंगोले, गोपाल यादव,दिनेश खोडके, गुड्डू चौधरी, बबलू दोडके, संजय ढोले, दिनेश जाऊरकर, अजय दंदे, जितेश नाईक, प्रमोद इंगोले, श्याम खेरडे, डॉ. गुणवंत डहाणे, पंकज लिंगीकर, श्याम परिहार, दिलीप लाड, प्रकाश मामर्डे, नाना बारबुद्धे, प्रकाश नांदुरकर, दीपक अग्रवाल, नंदा सोनोने, सुनंदा गौड, अरुणा मारोडकर, स्विटी अनासाने, भैय्यासाहेब निचळ, प्रकाश पाहुरकर, संजय बोबडे, विजय शिंदे, मंगेश ठाकरे, विजय वानखडे, गजानन जाधव, रफीक चिकुवाले, साजिद अली, हुसेन भाई, विजय अटळकर, काका जोशी, पिंटू मरोडकर, शरद पवार यांच्यासह काँग्रेस कमिटीचे विविध सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांच्या शिस्तबद्ध आणि उत्साही उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला एका मोठ्या महोत्सवाचे स्वरूप आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने उपस्थित सर्वांचे आभार मानण्यात आले.

# काँग्रेस भवनात विचारांची देवाणघेवाण

## सार्वजनिक वाचनालय सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

काँग्रेस भवनात सुरू करण्यात आलेल्या या नव्या सार्वजनिक वाचनालयाचे लोकार्पण ड. यशोमतीताई ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वाचनालयामध्ये पक्षाचे कार्यकर्ते आणि वाचनप्रेमींसाठी विविध विषयांवरील पुस्तकांचा खजिना उपलब्ध करून देण्यात आला आहे. केवळ राजकीय चळवळ नाही, तर सामाजिक आणि वैचारिक चळवळ जपणे ही काँग्रेसची संस्कृती आहे. आज माझ्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी जी पुस्तकतुला केली आणि वाचनालय सुरू केले, ते माझ्यासाठी सर्वात मोठे आणि मौल्यवान गिफ्ट आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून आपल्या कार्यकर्त्यांना आणि तरुणांना वाचनासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले असून, याद्वारे सुजाण आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध पिढी घडेल, असा मला विश्वास आहे. असे प्रतिपादन ड. यशोमतीताई ठाकूर यांनी यावेळी केले..

अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचा स्तुत्य पुढाकार

या कार्यक्रमाचे नियोजन अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी तथा अमरावती जिल्हा मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष प्रवीण मनोहर यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी यावेळी सांगितले की, यशोमतीताईंचे नेतृत्व नेहमीच पुरोगामी आणि विकासात्मक विचारांना चालना देणारे राहिले आहे. त्यामुळे त्यांचा वाढदिवस हा केवळ उत्सव म्हणून साजरा न करता, एक ज्ञानयज्ञ म्हणून साजरा करण्याचा निर्णय जिल्हा कमिटीने घेतला.या दिमाखदार सोहळ्याला काँग्रेसचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, सेवा दल आणि एन.एस.यु.आय.चे कार्यकर्ते, तसेच अमरावती जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, साहित्यिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी लोकनेत्या ड. यशोमतीताई ठाकूर यांना दीर्घायुष्याच्या आणि भावी राजकीय प्रवासाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी शिवसेना आक्रमक

## शेतकऱ्यांना मरणाच्या दारात लोटू नका - गोपाल पाटील अरबट

### पालकमंत्र्यांना निवेदन सादर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८दर्यापूर**

दर्यापूर व अंजनगाव तालुक्यात खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवरून शिवसेना आक्रमक झाली आहे. बोगस बियाणे, खत टंचाई, पीक कर्ज, विमा, वीजपुरवठा आणि वन्यप्राण्यांच्या नुकसानीमुळे शेतकरी मेटाकुटीला आला असून शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबणार नाही,असा इशारा शिवसेना जिल्हा समन्वयक गोपाल पाटील अरबट यांनी दिला.

खरीप हंगाम २०२६ पूर्वी शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या ८ प्रमुख मागण्यांसाठी गोपाल अरबट यांनी पालकमंत्री तथा महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांची दर्यापूर येथील उपविभागीय कार्यालयात भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

या निवेदनामध्ये केलेल्या मागणी नुसार बोगस बियाण्यांवर कठोर कारवाई, १५ जूनपूर्वी १०० टक्के पीक कर्ज वाटप, प्रलंबित पीक विमा तातडीने जमा करणे, दिवसा १२ तास अखंड वीजपुरवठा, कीटकनाशकांवर ५० टक्के अनुदान, मनरेगातून नाले व पांदण रस्त्यांची



कामे, १ ऑक्टोबरपासून हमीभाव खरेदी केंद्र सुरू करणे, तसेच रानडुक्कर व नीलगाय नुकसान भरपाई ३० दिवसांत देण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय शेती यंत्रांच्या भाडेदरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी निश्चित दर जाहीर करावेत, अशी मागणीही करण्यात आली.आम्ही शासनाच्या चांगल्या निर्णयांसोबत आहोत. मात्र शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले नाहीत तर रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय राहणार नाही,असा इशारा देत शासनासोबत आहोत, पण शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तडजोड नाही अशी आक्रमक भूमिका गोपाल पाटील अरबट यांनी घेतली आहे.दरम्यान, पालकमंत्री बावनकुळे यांनी सर्व मागण्या रास्त असल्याचे सांगत २० मे पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल,असे आश्वासन दिल्याची माहिती समोर आली आहे.निवेदन देण्यासाठी शिवसेनेचे महेंद्र भांडे, गणेश गावंडे, वैभव भांडे, विनय गावंडे, दीपक कावनपुरे, विलास साखरे, नागोराव केणे, गणेश धुराटे, सागर गेठे, अतुल सगने, राम गावंडे, राहुल भुबर, रमाकांत रहाटे, निरज नागे, मनोज गव्हाणे, नंदू निकोले, गजू चांदुरकर, सौरभ मलिये, हेमंत उमाळे, सोपान वडतकर, गजू खेडकर, शरद पोरे, सौरभ वायझाळे, प्रवीण पाचपोहे, शेखर डहाके, सूरज पाचखण्डे, नागेश कांबे, गोकुळ चांदुरकर, शरद अरबट, अनिकेत कोळमकर, परेश कडू, संजु राणे व नंदू जाभूळकर आदी उपस्थित होते.-

# सातेगावात स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

## अवैध देशी दारूचा साठा जप्त दोन आरोपी फरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अंजनगावं सुर्जी-**

अमरावती ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने सातेगाव परिसरात मोठी कारवाई करत अवैध देशी दारूचा साठा आणि एक मोटारसायकल जप्त केली आहे. या कारवाईत एकूण १,००,४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपी मात्र पोलिसांना गुंगारा देऊन फरार होण्यात यशस्वी ठरला.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. निकेतन कदम यांनी अवैध देशी दारूची वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. या आदेशान्वये १६ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर हे आपल्या पथकासह अंजनगाव उपविभागात नाकाबंदी आणि कोंबिंग ऑपरेशनसाठी पेट्रोलिंग करत होते.

या दरम्यान, पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, योगीराज मेश्राम (रा. दहिगाव रेचा, ता. अंजनगाव सुर्जी) हा त्याच्या साथीदारासह गांवडगाव व धुडकी गावाकडून सातेगावकडे मोटारसायकलवर पोत्यांमध्ये बेकायदेशीर देशी दारू भरून आणत आहे. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने सातेगाव येथे सापळा रचला.

**अंधाराचा आणि जंगलाचा फायदा घेत आरोपी फरार**



सापळा रचून थांबलेल्या पोलिसांना पाहून दारूची वाहतूक करणारे आरोपी घाबरले. त्यांनी आपली मोटारसायकल आणि दारूचा साठा घटनास्थळीच टाकून दिला आणि जवळच असलेल्या काटेरी जंगलाचा फायदा घेत तिथून पळ काढला. पोलिसांनी घटनास्थळावरून फरार आरोपी योगीराज मेश्राम याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू आहे

### १ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी घटनास्थळी टाकून दिलेल्या मुद्देमालाची झडती घेतली असता, त्यात खालील मुद्देमाल मिळून आला:

देशी दारू: ६७४ नग देशी दारूच्या पावट्या (अंदाजे किंमत ४०,४०० रुपये)मोटारसायकल: एक होंडा कंपनीची लिव्हो मोटारसायकल (अंदाजे किंमत ६०,००० रुपये)एकूण जप्त मुद्देमाल: १,००,४४० रुपये.ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्री. निकेतन कदम यांच्या आदेशाने आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि. मुलचंद भांबुरकर, अंमलदार सुधीर बावणे, मंगेश लकडे आणि चालक नईम शहा यांच्या पथकाने केली.-

# आशियाड कॉलनीत विजेचा लपंडाव; आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती -**

शहरातील शेगाव-रहाटगाव रोडवरील आशियाड कॉलनी परिसरात मागील काही दिवसांपासून वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता सकाळी व संध्याकाळी वीज गायब होत असल्याने त्रस्त झालेल्या नागरिकांनी महावितरणच्या मुख्य अभियंत्यांना लेखी निवेदन देत समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली आहे. अन्यथा कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.गेल्या २५ वर्षांपासून या परिसरात वास्तव्यास असलेले नागरिक नियमित वीज बिल भरत असूनही त्यांना सततच्या वीजखंडितीचा सामना करावा लागत आहे. कडक उन्हाळ्यात वृद्ध, लहान मुले आणि महिलांचे हाल होत असून विद्यार्थ्यांच्या परीक्षांवरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे. वीज नसल्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईलाही सामोरे जावे लागत आहे.दरम्यान, कमी-जास्त व्होल्टेजमुळे घरातील महागडी विद्युत उपकरणे जळत



असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. कॉलनीतील वकिलांचे संगणकीय कामकाज ठप्प होत असल्याने पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाया जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.महावितरण कार्यालयाशी संपर्क साधल्यास कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळतात, तसेच अधिकाऱ्यांचे फोन बंद किंवा व्यस्त असतात, असा आरोप नागरिकांनी केला. वाढत्या समस्येमुळे नागरिकांनी मुंबई येथील 'प्रकाशगड' कार्यालयातही तक्रार करण्याचा इशारा दिला आहे. निकृष्ट केबल बदलावी आणि नवीन ट्रान्सफॉर्मर बसवावा, अशी प्रमुख मागणी नागरिकांनी केली आहे. या निवेदनावर जे. डी. निर्मळ, विठ्ठलराव इंगळे, सुरेश तायडे, रामदास मालधारे, विजयराव ओगले, राजेश ठाकूर यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

## अचलपूरच्या जनतेला मोठा दिलासा मिळणार!

# अचलपूर येथे स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या हालचालींना वेग

## बच्चू कडूंच्या पाठपुराव्याला यशाची चाहूल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अचलपूर**

बच्चू कडू यांच्या सातत्यपूर्ण आणि आक्रमक पाठपुराव्यामुळे अचलपूर परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणारा विषय आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. अचलपूर येथे स्वतंत्र उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याच्या मागणीला अखेर शासन स्तरावर गती मिळाली असून परिवहन विभागाने यासंदर्भातील प्रशासकीय हालचाली सुरू केल्या आहेत.

ग्रामीण भागातील नागरिकांना वाहन परवाना, वाहन नोंदणी, फिटनेस, परमिट तसेच इतर वाहनविषयक कामांसाठी तब्बल १०० किलोमीटरपेक्षा अधिक अंतर कापत अमरावतीला जावे लागत होते. यामुळे सामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंडासोबतच मोठा मानसिक त्रासही सहन करावा लागत होता. जनतेच्या या अडचणी ओळखून बच्चू कडूंनी हा प्रश्न थेट शासन दरबारी लावून धरला.परिवहन मंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात बच्चू कडूंनी अचलपूर व चांदूर बाजार तालुक्यातील नागरिकांच्या समस्या सविस्तर मांडल्या होत्या. त्यांच्या या पाठपुराव्याची



दखल घेत परिवहन विभागाने आता अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सविस्तर अहवाल मागविला आहे. त्यामुळे अचलपूर येथे स्वतंत्र ठढज कार्यालय सुरू होण्याच्या आशा अधिक बळावल्या आहेत.

विशेष म्हणजे, बच्चू कडूंनी यापूर्वीच अमरावती शहर आणि अमरावती ग्रामीण असे स्वतंत्र वाहन क्रमांक देण्याची मागणी शासनाकडे केली होती. नागपूर शहर आणि नागपूर ग्रामीणच्या धर्तीवर अमरावतीलाही स्वतंत्र ओळख मिळावी, अशी त्यांची भूमिका आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रशासनिक विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचे त्यांनी वारंवार अधोरेखित केले आहे.अचलपूर हा भविष्यात स्वतंत्र जिल्हा म्हणून विकसित होऊ शकणारा सक्षम भाग असून येथे आवश्यक प्रशासकीय सुविधा, विस्तृत जागा आणि वाहन प्रशिक्षणासाठी ट्रॅक उभारणीची क्षमता उपलब्ध असल्याचेही बच्चू कडूंनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.अचलपूर येथे स्वतंत्र उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू झाल्यास अचलपूर, चांदूर बाजार आणि परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सरकारी सेवा अधिक वेगवान, सुलभ आणि लोकाभिमुख होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.-

# चांदूर बाजारात एमडी ड्रग्जसह तिघे जेरबंद

## वाहन व मोबाईलसह ₹१.१८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८चांदुर बाजार**

अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष कोंबिंग ऑपरेशनदरम्यान चांदूर बाजार पोलिसांनी मोठी कारवाई करत एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थ बाळगणाऱ्या तिघांना ताब्यात घेतले. आरोपींकडून एमडी ड्रग्ज, मोटारसायकल आणि मोबाईल असा एकूण १ लाख १८ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशान्वये १६ मेच्या रात्रीपासून १७ मेच्या पहाटेपर्यंत अमरावती ग्रामीण जिल्ह्यात विशेष कोंबिंग ऑपरेशन व गस्त मोहीम राबविण्यात आली होती. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार यांना गुप्त माहिती मिळाली की, चांदूर बाजार येथील राजा, साद आणि अनवेज हे अमरावतीहून एमडी घेऊन परत येणार आहेत.माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. राजपत्रित अधिकारी, पंच, फोटोग्राफर तसेच इलेक्ट्रॉनिक वजन काट्यासह पथक तयार करून ग्राम खरवाडी फाटा, चांदूर बाजार-वलगाव रोड येथे सापळा रचण्यात आला. पहाटे दोन वाजताच्या सुमारास एका बजाज पल्सर मोटारसायकलवरून येणाऱ्या तिघांना अडवून पंचासमक्ष झडती घेण्यात आली.या कारवाईत अनवेज शहा शरीफ शहा (१८), फिदा हुसेन उर्फ राजा झाकीर हुसेन (२२) आणि साद अहमद मस्ताक अहमद (१८) या तिघांकडून ७.१९० ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) जप्त करण्यात आले. प्राथमिक एफएसएल तपासणीत हा पदार्थ मेफेड्रोन असल्याचे स्पष्ट झाले.आरोपींकडून अंदाजे २८,८७० किंमतीचे एमडी, ७० हजारांची मोटारसायकल तसेच दोन मोबाईल जप्त करण्यात आले. याप्रकरणी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# दोन तासांत खुनाचा गुन्हा उघड; तीन आरोपी जेरबंद

### अमरावती गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई,जुन्या वादातून तरुणाची हत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

अमरावती शहरातील खोलापुरी गेट पोलीस स्टेशन हद्दीतील झेंडा चौक, माळीपुरा परिसरात झालेल्या खुनाच्या गुन्ह्याचा अवघ्या दोन तासांत छडा लावत अमरावती शहर गुन्हे शाखेने तीन आरोपींना ताब्यात घेत मोठी कारवाई केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. माहितीनुसार, दिनांक १७ मे २०२६ रोजी नियंत्रण कक्षाला माळीपुरा परिसरात एका तरुणाचा खून झाल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने




तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. मृत तरुणाची ओळख तेजस श्रीकृष्ण बिलबिले (रा. माळीपुरा, अमरावती) अशी पटली.गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीदार, तांत्रिक विश्लेषण व तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेत कुंड सरजापूर, वडाळी आणि मालटेकडी परिसरातून तिघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान जुन्या वादातून आरोपींनी तेजस बिलबिले याच्यावर चाकूने छातीत वार करून त्याची हत्या केल्याची कबुली दिली. तसेच कार्तिक दिगांबर बोरुडे (रा. माळीपुरा) याच्यावरही प्राणघातक हल्ला करून ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले.ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये आकाश राजू बेलसरे (वय २७), वैभव राजू बेलसरे (वय २५) आणि राजू उत्तमराव बेलसरे (वय ५८, सर्व रा. माळीपुरा, अमरावती) यांचा समावेश आहे. पुढील कारवाई साठी आरोपींना खोलापुरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शना खाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# अप्पर वर्धा कालव्यालगत कोट्यवधींची मुरूम चोरी

## गंगाजळी, रामगाव, जळगाव आर्वी परिसरात अवैध उत्खनन; महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८धा.रेल्वे** तालुक्यात गौणखनिज माफियांचा सुळसुळाट वाढत असून अप्पर वर्धा धरणाच्या मुख्य कालव्यालगत साठवून ठेवलेला कोट्यवधी रुपयांचा मुरूम अवैधरित्या चोरीला गेल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. मौजा रामगाव, गंगाजळी आणि जळगाव आर्वी परिसरात कालव्यालगतच्या टेकड्या मशीनच्या सहाय्याने पोखरून मोठमोठे खड्डे करण्यात आले आहेत.अप्पर वर्धा धरणाच्या मुख्य कालव्याच्या भिंतीलगत मोठ्या प्रमाणात मुरूम साठवून ठेवण्यात आला होता. कालव्याच्या बांधकामादरम्यान निघालेला हा मुरूम भविष्यातील दुरुस्ती, आपत्कालीन परिस्थिती तसेच कालव्याच्या भिंतीच्या संरक्षणासाठी राखीव ठेवण्यात आला होता. मात्र गेल्या काही



महिन्यांपासून गौणखनिज माफियांनी दिवसाढवळ्या या मुरूमाची चोरी सुरू केल्याचे समोर आले आहे.मोठमोठ्या मशीन आणि ट्रकच्या सहाय्याने सुरू असलेल्या उत्खननामुळे कालव्याच्या सुरक्षिततेवरच प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेक ठिकाणी कालव्याच्या भिंतीलगत खोल खड्डे आणि तळे तयार झाले असून याच मार्गाने अवैध गौणखनिज वाहतूकही सुरू असल्याचे सांगितले जात आहे. कोट्यवधींचा मुरूम लंपास होत असताना संबंधित प्रशासनाकडून ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.दरम्यान, या गौणखनिज तस्करीत महसूल विभागातील एका माजी अधिकाऱ्याच्या मुलाचा सहभाग असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. कोतवाल, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या हद्दीत सुरू असलेले हे उत्खनन त्यांच्या निदर्शनास नसणे अशक्य असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.याबाबत तहसीलदार अभय घोरपडे यांनी अवैध उत्खनन व वाहतूक आढळल्यास तातडीने कारवाई करण्यात येईल. अप्पर वर्धा कालव्याच्या मुरूम चोरीप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल, असे सांगितले. दरम्यान, शेतकरी व नागरिकांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## एमआयएम व सुफियान वेलफेअर सोसायटीतर्फे

# २० मे रोजी जिल्हास्तरीय सामूहिक निकाह सोहळा

### ३४ जोडप्यांचा होणार विवाह; माजी खासदार इम्तियाज जलील प्रमुख राहणार पाहुणे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती** :ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) अमरावती शाखा तसेच सुफियान एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २० मे रोजी अमरावती शहरात जिल्हास्तरीय इज्तेमाई निकाह अर्थात सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सोहळा सायंकाळी ६ वाजता सुकळी रोडवरील लालखडी परिसरातील अफ्फान हॉल तथा सुफियान हॉल येथे पार पडणार आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इम्तियाज जलील उपस्थित राहणार असून, त्यांच्यासोबत एमआयएमचे प्रदेश उपाध्यक्ष हाजी युसूफ पुंजानी तसेच प्रदेश महासचिव समीर साजिद बिल्डर यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.एमआयएमचे शहराध्यक्ष हाजी इरफान खान यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, या सामूहिक विवाह सोहळ्यात ३४ जोडप्यांचा निकाह लावण्यात येणार आहे. नवदाम्पत्यांना आयोजकांच्या वतीने जीवनावश्यक वस्तू भेटस्वरूप देण्यात येणार असून, समाजातील गरजू कुटुंबांना आधार देण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एमआयएमचे शहर उपाध्यक्ष मोहम्मद इक्बाल, महासचिव शहजाद खान, नासीर खान, सचिव हाजी अब्दुल वहीद, मौलवी इकराम, असलम शहजाद, अनीस शाह, प्रा. सना उल्ला, मोहम्मद फारुख, जाहीद खान, मोहम्मद समीर, फिरोज कुरेशी, शेख जफर, मोहम्मद रिजवान, जफर बेग तसेच मनपा गटनेते अब्दुल हमीद आणि पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# १५ व्या वित्त आयोगातून २६ ग्रामपंचायतींना ई - रिक्षा

## पालकमंत्र्यांच्या हस्ते हिरवी झेंडी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती,** जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून अमरावती जिल्ह्यातील २६ ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापनासाठी बॅटरी ऑपरेटेड ई-रिक्षांचे वाटप करण्यात येणार आहे. ग्रामीण स्वच्छता व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी जिल्ह्यात आता बॅटरी संचालित घंटागाड्या धावणार आहेत.जिल्हा परिषद येथे आयोजित कार्यक्रमात मा.ना. चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अमरावती जिल्हा यांच्या हस्ते या वाहनांना हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी आमदार प्रवीण तायडे, प्रताप अडसड, संजय खोडके, राजेश वानखडे, केवलराम काळे, उमेश उर्फ चंदू यावलकर, रवी राणा, महापौर श्रीचंद तेजवानी, विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, महानगर पालिका आयुक्त वर्षा लड्डा उपस्थित होते. घराघरातून कचरा संकलन, त्याचे वर्गीकरण



आणि शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेला या वाहनांमुळे गती मिळणार असून ग्रामीण स्वच्छतेसह पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळणार आहे. पारंपरिक डिझेल वाहनांच्या तुलनेत ही ई-वाहने पर्यावरणपूरक असून इंधन खर्चातही बचत होणार आहे. घनकचरा संकलन व व्यवस्थापन अधिक प्रभावी, शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने राबविण्यासाठी पंचायत विभागाच्या प्रशासकीय मान्यतेने ही वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. प्रत्येकी ३ लाख रुपये किंमतीच्या या वाहनांसाठी एकूण ७८ लाख रुपयांचा निधी १५ व्या वित्त आयोगातून उपलब्ध करून देण्यात आला आहे. ही वाहने लवकरच संबंधित ग्रामपंचायतींच्या स्वाधीन करण्यात येणार असून त्याद्वारे स्वच्छ भारत मिशन अभियानाला नवी गती मिळणार आहे.

**या गावांचा समावेश:**

अमरावती तालुक्यातील ब्राम्हणवाडा गोविंदपूर व लोणटेक, अचलपूर तालुक्यातील वडगाव फत्तेपूर व रासेगाव, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील टाकरखेडा मोरे व खानमपूर पांढरी, भातकुली तालुक्यातील आसरा व टाकरखेडा शंभू, चांदूर बाजार तालुक्यातील कुर्हा, चांदूर रेल्वे तालुक्यातील आमला व कवठा कडू, दर्यापूर तालुक्यातील पिंपलोद व थिलोरी, मोर्शी तालुक्यातील शिरखेड व खानापूर, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाढोणा रामनाथ व धानोरा गुरव, तिवसा तालुक्यातील शिरजगाव मो, वरुड तालुक्यातील हातुर्णा व शहापूर, धारणी तालुक्यातील हरिसाल व कुसुमकोट बु., धामणगाव रेल्वे तालुक्यातील अंजनसिंगी व वडगाव राजदी तसेच चिखलदरा तालुक्यातील टेंभूसोडा व काटकुंभ या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

# ग्रामीण भागात गावरान आंब्याला अधिक पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८कावली वसाड :**

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे. बाजारपेठेमध्ये आंब्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसत आहे. यामध्ये प्रामुख्याने गावरान आंबा हाच महत्त्वाचा असल्याचे दिसून येते. कारण गावरान आंब्याची चव लय भारी, असे म्हटल्या जाते.

सध्या विविध जातीचे आंबे बाजारामध्ये उपलब्ध आहेत. प्रामुख्याने हापूस, बदाम, नीलम, लंगडा व गावरानी अशा आंब्याच्या जाती सध्या ग्रामीण भागात पाहावयास मिळत आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणात



आंब्याची आवक आहे. त्यात गावरान आंबा यावर्षी मोठ्या प्रमाणात नागरिकांना मिळत आहे. त्यामुळे गावरान आंब्याला अधिक मागणी असल्याचे दिसून येत आहे.

धामणगाव रेल्वे तहसीलमधील अनेक गावांमध्ये आमराया उपलब्ध होत्या. परंतु जनावरांच्या त्रासामुळे त्या नष्ट झाल्या. काही प्रमाणात आजही आमराईर्ष ग्रामीण भागात उपलब्ध आहे. सोबतच अनेक शेतकऱ्यांकडे आपल्या शेतामध्ये एखादे तरी आंब्याचे झाड आहे. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांसोबतच नागरिकांनाही गावरान आंबा उपलब्ध होत आहे. गावरान आंबे सहज उपलब्ध होत असल्यामुळे आजही प्रत्येकाच्या घरामध्ये रस केला जात असल्याचे सध्यातरी या परिसरात दिसत आहे. साधारणतः ग्रामीण भागामध्ये पिकलेल्या आंब्याचे भाव ५० ते ६० रुपये किलो आहे. शहरी भागामध्ये हेच भाव मोठ्या प्रमाणात असल्याचेही बोलल्या जाते. ग्रामीण भागामध्ये अत्यल्प भावामध्ये गावरान आंबा मिळत असल्यामुळे त्याला मागणीसुद्धा वाढली आहे.

# तळेगाव ठाकूर येथे जनगणना टप्पा-१ च्या कामास सुरुवात

### १२ प्रगणक, २ पर्यवेक्षक मैदानात..

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८तळेगाव ठाकूर-** शासकीय आदेशानुसार जनगणना २०२६ च्या पहिल्या टप्प्यातील (टप्पा-१) प्रत्यक्ष कामकाजाला तळेगाव ठाकूर येथे दि. १६ मे २०२६ पासून उत्साहात सुरुवात झाली आहे. या टप्प्यात घरनोंदणी (हाऊस-लिस्टिंग) व सूचीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून, गावातील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे.

या मोहिमेसाठी एकूण १२ प्रगणक नियुक्त करण्यात आले असून त्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी २ पर्यवेक्षक कार्यरत आहेत. संबंधित कर्मचारी गावातील प्रत्येक गल्ली व घराला प्रत्यक्ष भेट देत माहिती संकलनाचे काम करत आहेत.

पहिल्या टप्प्यात मुख्यत्वे घरांची यादी तयार करणे, प्रत्येक घराला क्रमांक देणे तसेच कुटुंबातील सदस्यांची प्राथमिक माहिती गोळा करणे या बाबींवर भर देण्यात येत आहे. प्रगणक मोबाईल प व शासनाने निर्धारित नमुन्यानुसार डिजिटल पद्धतीने माहितीची नोंद करत असून, पर्यवेक्षकांकडून त्याची तत्काळ पडताळणी केली जात आहे. त्यामुळे माहिती संकलन प्रक्रियेत अचूकता आणि पारदर्शकता राखली जात आहे.

दरम्यान, जनगणना हे देशाच्या विकासनियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य असल्याने नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन महसूल विभाग व जनगणना प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. घरभेटी दरम्यान येणाऱ्या प्रगणकांना योग्य व अचूक माहिती द्यावी तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी व्हावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या कामकाजात पर्यवेक्षक म्हणून पवन सुरेश हेडा व वर्षा कावळे कार्यरत असून, प्रगणक म्हणून नवनीत निशाण, गणेश लव्हाळे, सुचिता ढाले, अमोल भोपळे, रवींद्र चव्हाण, नितू मेटकर, संगीता गाडगे, राजेंद्र चारथड, अनिल भारती, शेषराव कांडलकर, किरण कठाणे व बंडू सोळंके हे कार्य पाहत आहेत.

# नवीन जलवाहिनीचे काम युद्धपातळीवर सुरु

## ३० टक्के काम पूर्ण, सुमारे ५५ किलोमीटर लांबीची नवीन पाईपलाइन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती :**

अमरावती आणि बडनेरा शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी उभारण्यात येत असलेल्या नवीन जलवाहिनी प्रकल्पाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून आतापर्यंत सुमारे ३० टक्के काम पूर्ण झाले आहे.

पुढील वर्षी जानेवारीपर्यंत हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर दोन्ही शहरांतील नागरिकांना नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा होणार असल्याने मोठा दिलासा मिळणार आहे.





अमरावती आणि बडनेरा शहराला मोर्शी येथील अप्पर वर्धा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र तब्बल ३५ वर्षांपूर्वी टाकण्यात आलेली जुनी पाइपलाइन आता पूर्णपणे जीर्ण झाली आहे.

वारंवार पाइपलाइन फुटणे, गळती होणे आणि पाणीपुरवठा विस्कळीत होणे या समस्यांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर शासनाने ८६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून नवीन जलवाहिनी प्रकल्प हाती घेतला आहे.

या प्रकल्पांतर्गत सुमारे ५५ किलोमीटर लांबीची नवीन पाइपलाइन टाकण्यात येत आहे. अमरावती-मोर्शी रोड परिसरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात खोदकाम व पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू असून यंत्रसामग्रीच्या सहाय्याने कामाला वेग देण्यात आला आहे.

संबंधित विभागाच्या माहितीनुसार, सध्या प्रकल्पाचे ३० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामही निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.नवीन पाइपलाइन कार्यान्वित झाल्यानंतर पाण्याची गळती कमी होणार असून अमरावती आणि बडनेरा शहरातील नागरिकांना भविष्यात अधिक सक्षम व नियमित पाणीपुरवठा मिळणार आहे.

---

### आ. संजय खोडके यांच्या पाठपुराव्याला यश

## मजीप्रा कंत्राटदारांच्या थकीत देयकांसाठी १४.६६ कोटी जमा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण (मजीप्रा) कंत्राटदारांच्या मागील वर्षभरापासून रखडलेल्या थकीत देयकांचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून १४ कोटी ६६ लाख रुपयांची रक्कम मजीप्राच्या एसबीआय खात्यात जमा करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधान परिषद सदस्य संजय खोडके यांच्या पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध झाल्याने कंत्राटदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.मजीप्रा कंत्राटदार असोसिएशनच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातील सुमारे १५.३१ कोटी



रुपयांची देयके प्रलंबित असल्याने गेल्या आठवडाभरा पासून आंदोलन सुरू करण्यात आले होते. या आंदोलनामुळे मजीप्राची विविध कामे ठप्प झाली होती. तसेच अमरावती शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेवर ही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती.दरम्यान, १४ मे रोजी आमदार संजय खोडके यांनी आंदोलनस्थळी भेट देत कंत्राटदारांच्या मागण्या जाणून घेतल्या. कामाचे हक्काचे पैसे मिळाल्याशिवाय नवीन कामे करणार नाही, अशी ठाम भूमिका कंत्राटदारांनी घेतली होती. यानंतर आ. खोडके यांनी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करत संबंधित विभागाशी समन्वय साधला. त्यांच्या मध्यस्थीनंतर प्रशासकीय हालचालींना वेग आला आणि अखेर १४.६६ कोटी रुपयांचा निधी मजीप्राच्या खात्यात जमा करण्यात आला.निधी जमा झाल्याची माहिती मिळताच कंत्राटदारांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, रखडलेली कामे पुन्हा गतीने सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# शाळेतील ॲडमिशनसाठी ‘दादां’ची शिफारस अनिवार्य?

## आमदारांनाही आला अनुभव; अंजनगावात शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील एका प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेच्या शाळांमध्ये प्रवेश प्रक्रियेदरम्यान सुरू असलेल्या कथित शिफारस संस्कृतीमुळे पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, या प्रकाराचा अनुभव आता थेट विद्यमान आमदारांनाही आल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. साध्या शालेय प्रवेशासाठीही त्या दादांना भेटा, यांच्या कानावर टाका, त्यांच्याशी आधी बोला अशा सल्लयांचा भडीमार होत असल्याने शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.तालुक्यातील ही नामांकित संस्था गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखली जाते. दरवर्षी येथे प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात




पालकांची गर्दी होत असते. मात्र, प्रवेश प्रक्रिया सुरू होताच काही संचालक व पदाधिकाऱ्यांचा ‘मानाचा पोळा’ सुरू होतो, अशी चर्चा अनेक वर्षांपासून तालुक्यात दबक्या आवाजात होत आहे. प्रवेशासाठी आलेल्या पालकांना थेट निर्णय न देता त्यांना विविध संचालक, कार्यकर्ते किंवा स्थानिक प्रभावशाली व्यक्तींकडे पाठवले जात असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.गोरगरीब व सर्वसामान्य पालकांना शाळेच्या संचालकांच्या घरी किंवा कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत असल्याचे चित्र दिसून येते. काही पालकांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, साहेब घरी नाहीत, उद्या या, नंतर बघू, त्या दादांना भेटून या अशी उत्तरे देत पालकांना अनेक दिवस फिरवले जाते. शिक्षणासाठी आलेल्या पालकांची ही परवड पाहून अनेकांनी या प्रक्रियेलाच ‘पोळा उत्सव’ असे नाव दिले आहे.

विशेष म्हणजे, हा अनुभव केवळ सामान्य नागरिकांपुरता मर्यादित राहिलेला नाही. मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे यांनाही अलीकडेच एका प्रवेशाच्या संदर्भात अशीच वागणूक मिळाल्याची माहिती समोर आली आहे. एका संचालकाने थोडं त्यांच्याशी बोला, दुसऱ्याने त्यांच्या कानावर टाका, तर तिसऱ्याने त्या दादांची शिफारस घ्या असे सांगितल्याने आमदारही संतप्त झाल्याचे बोलले जात आहे.या घटनेनंतर तालुक्यात शिक्षण व्यवस्थेतील कथित गटबाजी, शिफारस संस्कृती आणि पालकांची होणारी मानसिक व आर्थिक पिळवणूक याबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश द्यायचा की शिफारशीच्या आधारे? असा सवाल अनेक पालक उपस्थित करत आहेत. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी तर अशा प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी शिक्षण विभागाने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी केली आहे.

> दरम्यान, या प्रकरणाबाबत आमदार गजानन लवटे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की,मला सुद्धा दादांना भेटा या बाबत सांगण्यात आले होते या संदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. पालकांना विनाकारण फिरवले जाणार नाही. लवकरच संबंधित संस्थांशी बैठक घेऊन पारदर्शक प्रवेश प्रक्रिया राबवण्याबाबत निर्णय घेतला जाईल. अंजनगाव सुर्जी तालुक्यात सध्या या दादांना भेटा, त्या दादांना भेटा हीच चर्चा रंगली असून, शिक्षणासारख्या संवेदनशील क्षेत्रात सुरू असलेल्या या कथित प्रकारामुळे पालकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता प्रशासन व शिक्षण विभाग यावर नेमकी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# तिवसा पंचायत समितीत विजेची उधळपट्टी

## अधिकारी बाहेर तरी कॅबिनमध्ये कुलर-पंखे सुरूच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील तिवसा पंचायत समिती कार्यालयात विजेची मोठ्या प्रमाणात उधळपट्टी होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. शासनाकडून काटकसरीचे वारंवार आवाहन करण्यात येत असताना पंचायत समितीतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडूनच त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. कार्यालयातील अनेक कॅबिन व विभागांमध्ये अधिकारी-कर्मचारी उपस्थित नसतानाही कुलर, पंखे तसेच इतर विद्युत उपकरणे सुरू ठेवली जात असल्याचे नागरिकांनी



निदर्शनास आणून दिले आहे.विशेष म्हणजे कार्यालयातील अनेक कर्मचारी बाहेर कामानिमित्त किंवा इतर कारणाने गेलेले असतानाही त्यांच्या कक्षातील विद्युत उपकरणे तासन्तास सुरूच राहत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे शासनाच्या निधीतून दर महिन्याला हजारो रुपयांचे वाढीव वीज बिल पंचायत समितीला भरावे लागत असल्याची चर्चा आहे.राज्य सरकारने ऊर्जा बचत व खर्च नियंत्रणासाठी विविध शासकीय कार्यालयांना वीज वापरात संयम बाळगण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र तिवसा पंचायत समितीत या सूचनांकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सामान्य नागरिकांना वीज बचतीचे धडे देणारे अधिकारी स्वतःच नियम पाळत नसतील तर शासनाच्या काटकसरीच्या धोरणाला काय अर्थ उरतो? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.या प्रकाराची वरिष्ठ प्रशासनाने दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

(कलर)(बॉक्स)काही कर्मचारी जेवण व नाश्त्यासाठी बाहेर गेल्यानंतरही केबिन गरम होऊ नये म्हणून कुलर सतत सुरू ठेवण्यात येतात.असे कार्यालयात येणारे नागरिक सांगतात.-

---

# शिक्षक बँकेच्या ‘त्या’ ४ संचालकांना उच्च न्यायालयातही दिलासा नाही; याचिका फेटाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अचलपूर :**

१० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतरही पदावर कायम राहिलेल्या शिक्षक बँकेच्या चार संचालकांना मोठा धक्का बसला असून, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्या याचिकेला दिलासा देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आता विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, अमरावती हे संबंधित संचालकांविरोधात कोणती कारवाई करतात, याकडे संपूर्ण सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.विभागीय सहनिबंधकांनी १३ एप्रिल २०२६ रोजी शिक्षक बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र पाठवून संबंधित संचालकांवर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या पत्राविरोधात बँकेचे संचालक गोकुळदास राऊत आणि अन्य संचालकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालात याचिकाकर्त्यांना कोणताही थेट दिलासा न देता, कारवाईपूर्वी संबंधितांना सात दिवसांची स्पष्ट नोटीस देणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.न्यायालयाच्या या आदेशानंतर आता चेंडू पूर्णपणे विभागीय सहनिबंधकांच्या कोर्टात गेला आहे. कारण, विभागीय सहनिबंधकांनी दिलेल्या नोटीसीला एक महिन्यापेक्षा अधिक कालावधी उलटून गेला असून अद्याप कोणती ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे आता प्रशासन न्यायालयाच्या आदेशानुसार तातडीने पावले उचलणार का, की पुन्हा दिरंगाई होणार, याबाबत सहकार क्षेत्रात चर्चा रंगू लागली आहे.या प्रकरणामागे सहकारी संस्थांमधील दीर्घकाळ चालत आलेल्या सत्ताकारणाचा मुद्दा अधोरेखित होत आहे. सहकारी बँकांमध्ये अनेकदा तीच मंडळी वारंवार निवडणूक लढवून विविध राजकीय आणि संघटनात्मक डावपेचांच्या जोरावर सत्तेत कायम राहत असल्याची टीका होत असते. यामुळे संस्थांमध्ये एकाधिकारशाही वाढून पारदर्शकतेचा अभाव निर्माण होतो, असा आरोप सातत्याने केला जातो.याच पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने सहकारी संस्थांमध्ये १० वर्षांपेक्षा अधिक काळ संचालकपद भूषविणाऱ्यांना पुन्हा निवडणूक लढविता येणार नाही, असा कायदा लागू केला आहे. या कायद्याअंतर्गत १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या संचालकांना पदावर राहण्याचा अधिकार राहत नाही.विभागीय सहनिबंधकांनी ज्या चार संचालकांविरोधात कारवाईचे निर्देश दिले आहेत, त्यामध्ये गोकुळदास राऊत, अजय पवार, प्रफुल्ल शेंडे आणि राजेंद्र गावंडे यांचा समावेश आहे. संबंधित संचालकांवर नियमानुसार कारवाई करावी, असे नोटीसमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. आता या प्रकरणात पुढे काय घडते, याकडे शिक्षक बँकेच्या सभासदांसह संपूर्ण सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

---

# अमरावती जिल्ह्यात लागले २० टँकर ; पाणीटंचाई वाढली

## १७ गावांत खासगी विहिरींचे अधिग्रहण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती:**

जिल्ह्यात पाणीटंचाईची धग वाढली असून चिखलदरा तालुक्यातील आठ गावांना २० टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा होत आहे. १७ गावांमध्ये खासगी विहिरींचे अधिग्रहण करून नागरिकांना पाणीपुरवठा केल्या जात आहे. टंचाईची तीव्रता येत्या काही दिवसांत वाढण्याची शक्यता आहे. एप्रिलमध्ये तापमानवाढी सोबतच पाणीटंचाईची तीव्रतासुद्धा वाढली आहे. चिखलदरा तालुक्यातील २५० पेक्षा अधिक गावांना पाणीटंचाई भेडसावत असून टँकरची गावे वाढत चालली आहेत. विशेष म्हणजे, या आठवड्यात पुन्हा काही गावांना टँकर लागण्याची शक्यता आहे.शिवाय खासगी विहिरींचे अधिग्रहणसुद्धा होणार आहे. यंदा मार्च महिन्यापासूनच टँकर सुरु झाले. एप्रिलच्या मध्यावर आठ गावांत २० टँकर लागले आहेत, तर दररोज विहिरींचे अधिग्रहण होत आहे.

येत्या आठवड्यात टँकरवर अवलंबिणाऱ्या गावांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विशेष म्हणजे, गतवर्षी चिखलदरा तालुक्यातील १९ गावांना जुलै व ऑगस्टपर्यंत टँकर सुरू होते. यंदासुद्धा अशीच परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.

> **या गावांत विहिरींचे अधिग्रहण**
>
> मोथा, खडीमल, गौलखेडा बाजार, बहादरपूर, आकी, मेहरियम, आलाडोह, शहापूर, गवळीढाणा, खुदावनपूर, चूनखडी, आवागड, वस्तापूर, कामिदा, बामादेही, चुरणी, लवादा.
>
> जिल्ह्यातील ज्या गावांना आवश्यकता आहे त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या सोबतच काही ठिकाणी उपाययोजना सुद्धा सुरू आहेत. गरज आहे त्या ठिकाणी टँकरचे प्रश्ताव मागविण्यात आल आहे.
>
> **- स्नेहा धावडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

**कायमस्वरुपी उपाययोजनाच नाहीत-** मेळघाटात जलजीवन मिशनची कामे मोठ्या प्रमाणात झाल्याचे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात पाणीटंचाईची धग कायम आहे. या ठिकाणी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात येत नसल्याने दर उन्हाळ्यात हीच स्थिती कायम आहे.

**या गावात लागले टँकर**

मोथा : तीन, खडीमल : सहा, गौलखेडा बाजार : दोन, बहादरपूर : एक, आकी : एक, मेहरियम : दोन, आलाडोह (शहापूर) : दोन, आलाडोह : दोन, गवळीढाणा : एक



**जिल्ह्यात ४५ टक्के जलसाठा**

-वाढत्या तापमानाने सिंचन प्रकल्पातील जलसाठा झपाट्याने घसरू लागला आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पात ४८१ दलघमी साठा शिल्लक असून एकूण जलसंचाय पातळीच्या तो सरासरीने ४५ टक्के आहे. सर्वात मोठ्या अप्पर वर्धा प्रकल्पात २८० दलघमी साठा आहे. या धरणावर अमरावती शहरा सह ग्रामीण पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत. तर सात मध्यम प्रकल्पात ११३ दलघमी साठा असून यातील गडगा प्रकल्प कोरडा पडला आहे तर बोर्डीनाला प्रकल्पात केवळ ०.३५ दलघमी जलसाठा आहे. जिल्ह्यात ४८ लघूप्रकल्प असून त्यामधील जलसाठ्याची स्थिती फार चांगली नाही.

---

# विदर्भातही मॉन्सूनचे लवकर आगमन ....

## जूनच्या दुसऱ्या आठवड्यात धडकण्याची शक्यता, तज्ज्ञांनी वर्तविला अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर** नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सून अंदमानात दाखल झाल्याची आनंदवार्ता शनिवारी भारतीय हवामान विभागाने दिली आहे. मॉन्सूनची प्रगती अशीच यापुढेही कायम राहिल्यास २६ मेपर्यंत केरळमध्ये आणि जूनच्या दुसऱ्या आठवड्यात विदर्भात मॉन्सूनचे आगमन अपेक्षित असल्याची माहिती, हवामानतज्ज्ञ प्रा. सुरेश चोपणे यांनी दिली.विदर्भासह देशभरातील बळीराजा ज्या क्षणाची चातकाप्रमाणे वाट पाहत आहे, त्या मॉन्सूनने अंदमान व निकोबार बेटासह अरबी समुद्राच्या काही भागांत अधिकृत ‘एन्ट्री’ केली आहे. मॉन्सूनच्या पुढील वाटचालीसाठी सध्या अनुकूल वातावरण असल्यामुळे लवकरच तो केरळमध्येही दाखल होण्याची



शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मॉन्सून येत्या २६ मेपर्यंत केरळच्या किनारपट्टीवर धडकण्याची दाट शक्यता आहे.

उल्लेखनीय म्हणजे, अरबी समुद्रात यंदा सहा दिवस आधीच आगमन झाले आहे. मॉन्सूनच्या प्रगतीत कोणतीही बाधा किंवा ब्रेक लागला नाही आणि हाच ट्रेंड पुढेही कायम राहिला तर विदर्भातही यावर्षी निर्धारित तारखेच्या आतच मॉन्सून येण्याची शक्यता प्रा. चोपणे यांनी बोलून दाखविली.प्रा. चोपणे पुढे म्हणाले, गेल्या शंभर वर्षांचा इतिहास बघितल्यास, विदर्भात नेहमीच मॉन्सूनच्या आगमनात अनियमित दिसून आली आहे.